# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय रुग्णालय,अंबाजोगाई

जा.क्र.शावैमरुअं/सा.भांडार/ कंपभ/२५८६ / २०२३

दिनांक ११ /०५/ २०२३

## कंत्राटी पध्दतीने रिक्त पदाच्या भरतीसाठी जाहीरात

संस्थेमध्ये पुर्विपासून उपलब्ध असलेल्या यंत्रसामुग्रीच्या आधारे रुग्णांना अविरतपणे उपचार प्राप्त होण्यासाठी संस्थेतील यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीची विशेष देखभाल ठेवणे आवश्यक आहे. या शिवाय संस्थेमध्ये उपलब्ध ज्या यंत्रसामुग्रीचे देखभाल दुरुस्ती करार करण्यात आलेले नाहीत, अशी यंत्रसामुग्री व उपकरणे पुर्ण क्षमतेने कार्यरत राहणे आवश्यक आहे. या सर्व यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीच्या देखभाल दुरुस्तीकरीता संस्थारतरावर प् एक बायोमेडकल इजिनअरची १२० दिवसासाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्ती आवश्यक आहे.

तसेच या रुग्णालयात एम.आर.आय. मशीन प्रस्थापित करण्यात आलेली असून सदर एम.आर.आय. मशीन चालविण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने एम.आर.आय.मशीन चालविण्यासाठी रुग्णांना सुविधा पुरविण्यासाठी एम.आर.आय.तंत्रज्ञाची पदे कंत्राटी पध्दतीवर तात्पुरत्या स्वरुपात भरणे आवश्यक आहे.

तसेच या रुग्णालयात प्रस्थापित करण्यात आलेल्या ऑक्सीजन प्लांटची देखभाल करण्यासाठी ऑक्सीजन सहाय्यकाचे पद तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामणी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय रुग्णालय, अंबाजोगाई यांचे अधिपत्याखाली खाली नमुद करण्यात आलेली पदे कंत्राटी तत्वावर १२० दिवसांसाठी भरण्या करिता खालील पदांसमोर दर्शविण्यात आलेल्या अर्हता प्राप्त उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र | पदनाम | एकुण पदे | रिक्त पदाचे ठिकाण | शैक्षणी अर्हता | मानधन / परिश्रमीका वर | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बायोमेडीकल इंजिनीअर | १ | रामानंद तीर्थ ग्रामणी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई | बायोमेडीकल इंजिनअर या शाखेची मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी | रु. २५०००/- | किमान वयोमर्यादा १९ वर्ष, कमाल वायोमर्यादा<br>खुला - ३८ वर्ष<br>मागासवर्गीय - ४३ वर्ष |
| २ | एम.आर.आय. तंत्रज्ञ | २ | रामानंद तीर्थ ग्रामणी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई | (एक)ज्या उमेदवारंचे वय एकोणीस वर्षापेक्षा कमी नसेल आणि अडतीस वर्षापेक्षा जास्त नसेल : परंतु मागासवर्गिय उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिलक्षम असेल: | २५०००/- | किमान वयोमर्यादा १९ वर्ष, कमाल वायोमर्यादा<br>खुला - ३८ वर्ष<br>मागासवर्गीय - ४३ वर्ष |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (दोन) ज्यांनी परावैद्यक तंत्रज्ञान (किरणोत्सार) ही पदवी अथवा विज्ञान शाखेतील परावैद्यक तंत्रज्ञान (किरणोत्सार) ही पदवी धारण केली असेल : किंवा<br>ज्यांनी भौतीकशास्त्र आणि रसायनशास्त्र किंवा जीवशास्त्र या विषयांसह विज्ञान शाखेतील पदवी : आणि किरणोत्सार या विषयातील पदविका किंवा प्रमाणपत्र धारण केले असेल :<br>परंतु, शासनमान्य रुग्णालयांमध्ये क्ष-किरण तंत्रज्ञ किंवा किरणोत्सार तंत्रज्ञ या पदावरील किमान एक वर्ष कलावधीचा अनुभव धारण करणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. | | |
| ३. | ऑक्सीजन सहाय्यक | १ | रामानंद तीर्थ ग्रामणी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई | (एक)बी.ई. (मेकॅनिकल / इन्सट्रुमेंटेशन मध्ये)<br>(दोन) डिप्लोमा (मेकॅनिकल / इन्सट्रुमेंटेशन मध्ये),<br>अनुभव १ वर्ष | २०००० | किमान वयोमर्यादा १९ वर्ष, कमाल वायोमर्यादा<br>खुला - ३८ वर्ष<br>मागासवर्गीय - ४३ वर्ष |

**परिश्रमिकावर** :- उपरोक्त परिश्रमिक हे दरमहा एकत्रीत आहे, इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय नाहीत.

**अर्ज करण्याची अंतिम तारिख** :- ११ मे, २०२३ ते १७ मे, २०२३

दिनांक १७ मे, २०२३ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्ज स्विकारले जातील)

**अर्जाची छाननी:** दिनांक - १८-०५-२०२३

**यादी प्रसिध्दीचा दिनांक** :- १९.०५.२०२३ (यादी सकाळी ११.०० वाजता संस्थेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल)

दिनांक १९.०५.२०२३ रोजी नोटीस बोर्डवर प्रसिध्द केलेल्या यादीवर कोणाचा आक्षेप असेल तर , आक्षेप दिनांक १९.०५. २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत नोंदविण्यात यावा. विहित कालावधी नंतर घेतलेल्या आक्षेपाची नोंद घेण्यात येणार नाही.

**उमेदवारांची अंतिम यादी** दिनांक २०.०५.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**मुलाखातीची तारीख** -२२.०५.२०२३ वेळ सकाळी ११.०० (मुलाखती पुर्वि १ तास आगोदर उमेदवारांनी उपस्थित राहुन उपस्थिती रजिस्टर मध्ये आपले नांव नोंदवुन स्वाक्षरी करणे बंधनकारक राहील. )

**मुलाखतीचे ठिकाण** - अधिष्ठाता कार्यालय, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई.

Scanned with OKEN Scanner

अटी व शर्ती

१.सदरची नियुक्ती पुर्णपणे कंत्राटी त्त्वावर असल्याने नियुक्त होणा-या उमेदवारांना शासकिय कर्मचारी यांना मिळणा-या सोईसुविधांचा लाभ मिळणार नाही.

२.करार पध्दतीवरील नियुक्तीसाठी उमेदवारास किमान आवश्यक शैक्षणीक अर्हता व अनुभवाच्या अटींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३.करार पध्दतीवर नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा वैद्यकिय अधिक्षक, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय रुग्णालय, अंबाजोगाई हे नियमीतपणे घेतील. आढावा असमाधानकारक असल्यास संबंधित उमेदवाराची नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांच्याकडे राहतील.

४.करार पध्दतीच्या उमेदवारास विभगाचे प्रमुख यांच्या नियंत्रणाखाली आपले कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील. तसेच या उमेदवारांना नियमीत पुर्ण वेळ काम करणे बंधनकारक राहील. सदर पदे ही साथरोग नियंत्रण प्रकल्पांतर्गत असल्याने परिसरात उद्भवणा-या कोविड १९ तसेच इतर साथरोगाच्या उद्रेकांच्या वेळी प्रसंगानुरुप उद्रेकाच्या ठिकाणी जाऊन कामकाज करावे लागेल.

५करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमीत नियुक्तीसाठी कोणताही हक्क सांगता येणार नाही.

६.करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांनी कामावर रुजु होण्यापुर्वी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याची लेखी हमी सादर करणे आवश्यक आहे. तसेच पदाच्या नियुक्ती च्या आदेशा संदर्भित घेवून मा. न्यायालयात कायमस्वरुपी कामावर सामावुन घेणेबाबत याचिका दाख करणार नसल्या बाबत निवड झालेल्या उमेदवाराने प्रतिज्ञापत्र लिहुन द्यावे लागेल.

७.नियम व अटींच्या अधिनराहुन नियुक्ती आदेश देण्यात येतील. उच्च शैक्षणिक अर्हता धारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

८.उमेदवारास संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. एमएस - सीआयटी किंवा तत्सम संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र अपेक्षीत आहे.

९.निवड समितीचा निर्णय हा अंतीम राहील यासाठी कोणतेही निवेदन / तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१०.कोणतीही पुर्वसुचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलण्याचे किंवा रद्य करण्याचे अधिकारी मा. अधिष्ठाता यांनी राखुन ठेवले आहेत.

११.नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपेआप अपात्र ठरतील.

१२. अर्जदारास मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

१४ अर्जदाराने मुळ कागदपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१४.अर्ज आवश्यकत्या कागदपत्रांच्या प्रतिसह परिपुर्ण भरावा. अपुर्ण भरलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. मुलाखतीच्या दिवशी आवश्यक ती सर्व मुळ कागदपत्रे सोबत आणावेत.

१५.मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र दिले जाणार नाही. तसेच मुलाखतीस उपस्थित राहण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अथवा दैनंदिनभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

१६. उपरोक्त उल्लेखिलेल्या पदांवर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम, २००५ मधील तरतुदीनुसार व त्या बाबत शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमांनुसार नियुक्ती वेळी लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील, अन्यथा सदर व्यक्ती नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही.

**मुलाखतीचे स्वरुप खालील प्रमाणे राहील -**

१. नियुक्तीसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पडताळणी

२. १०० मार्काचे गुणांकन :- गुणांकन खालील प्रमाणे राहील.

**१. जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अनुक्रमांक १ वरिल पदासाठी**

अ - किमान अर्हता - बायोमेडीकल इंजिनिअर या शाखेची मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदविपरिक्षा उत्तीर्ण - ५० टक्के

Scanned with OKEN Scanner

ब - मान्यता प्राप्त विद्यापिठाची बायोमेडीकल इंजिनअर या शाखेची पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण - २५ टक्के

क - अनुभ - २५ टक्के

एकूण - १०० टक्के

२. जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अनुक्रमांक २ वरिल पदासाठी

अ - किमान अर्हता - विद्यान शाखेची (फिजीक्स, केमेस्ट्री, बायॉलॉजी या विषयांसह) मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवि परिक्षा उत्तीर्ण - ५० टक्के

ब - मान्यता प्राप्त विद्यापिठाची फिजीक्स विषयातील पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण - २५ टक्के

क - अनुभ - २५ टक्के

एकूण - १०० टक्के

३. जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अनुक्रमांक ३ वरिल पदासाठी -

अ - किमान अर्हता - बी.ई. (मेकॅनिकल / इन्सट्रुमेंटेशन मध्ये) - ५० टक्के
किंवा डिप्लोमा (मेकॅनिकल / इन्सट्रुमेंटेशन मध्ये)

ब - एम.ई . (मेकॅनिकल / इन्सट्रुमेंटेशन मध्ये) -२५ टक्के

क - अनुभ - २५ टक्के

एकूण - १०० टक्के

अधिष्ठाता,
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय
वैद्यकिय महाविद्यालय रुग्णालय, अंबाजोगाई

प्रत.
१. संस्थेची वेबसाई
२. संस्थेचे नोटीस बोर्ड

Scanned with OKEN Scanner